निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७९ वा.
शनिवार :१३ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## महानगरपालिका निवडणुका महायुती म्हणूनच लढविण्याचा एकमताने निर्णय -रविंद्र चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर /प्रतिनिधी/** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत दिलेली माहिती महायुतीच्या पुढील राजकीय रणनीतीचा स्पष्ट रोडमॅप दाखवते. नागपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, मुंबईसह राज्यातील सर्व प्रमुख महानगरपालिका निवडणुका महायुती म्हणूनच लढविण्याचा एकमताने निर्णय वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत घेण्यात आला आहे.चव्हाण यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच भाजपाच्या कोअर कमिटीतील प्रमुख सदस्य यांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत आगामी महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका कोणत्या स्वरूपात लढवायच्या, यावर सविस्तर चर्चा झाली. महानगरपालिका निवडणुका जानेवारी महिन्यात होण्याची शक्यता असून मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये घटकपक्षांनी एकत्रित लढण्याची गरज असल्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले.

### महायुतीचा विस्तार

महायुतीमध्ये भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), आरपीआय (अथवा रामदास आठवले गट), तसेच इतर छोटे घटकपक्ष यांचा समावेश असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. लोकहिताच्या व विकासाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यातील फडणवीस-शिंदे-पवार युती यांच्या नेतृत्वाला बळ मिळावे यासाठी एकत्रितपणे लढणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**जिल्हा परिषद निवडणुकीवर आरक्षणाचा प्रश्न**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमधील आरक्षणाचा मुद्दा अजूनही उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे या निवडणुका उशिरा होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकांबाबत निर्णय न्यायालयातील



प्रक्रियेवर अवलंबून असेल, असेही त्यांनी सांगितले.

**महानगरपालिका स्तरावर समित्या**

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेनुसार, प्रत्येक प्रमुख महानगरपालिकेसाठी वेगवेगळ्या समित्या गठित केल्या जातील. या समित्या स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून युतीचा फॉर्म्युला, जागावाटप, प्रचार आराखडा आणि उमेदवार निवड यावर निर्णायक भूमिका बजावतील.

चव्हाण यांनी सांगितले की, महायुतीमध्ये समन्वय वाढवण्यासाठी विशेष मेकॅनिझम तयार केला जात आहे, जेणेकरून सर्व घटकपक्ष एकत्रितपणे निवडणूक लढतील.

**नेतृत्वाच्या बैठका आणि भूमिका**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या देवगिरी निवासस्थानी चव्हाण यांची झालेली स्वतंत्र बैठकही महत्त्वाची ठरली. त्या बैठकीत मुंबई आणि इतर महानगरपालिका निवडणुका एकत्रितपणे लढण्याचा सकारात्मक विचार पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात आला. त्याचबरोबर महायुतीतील सर्व अंतिम निर्णय फडणवीस, शिंदे, अजित पवार आणि अन्य वरिष्ठ नेत्यांच्या सामूहिक चर्चेनेच घेतले जातील असे त्यांनी स्पष्ट केले.

रविंद्र चव्हाण यांच्या निवेदनातून हे स्पष्ट दिसते की,सर्व प्रमुख महानगरपालिका निवडणुका महायुती स्वरूपातच लढवण्याचा निर्णय पक्का आहे.जागावाटप स्थानिक परिस्थिती, जनमत आणि लोकहिताच्या दृष्टीने ठरवले जाईल.महायुती मजबूत करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरील साखळी बैठका सुरू आहेत.यामुळे महाराष्ट्रातील नागरी निवडणुकांमध्ये महायुती एक प्रमुख आणि संघटित राजकीय शक्ती म्हणून झोकात उतरते, हे निश्चित झाले आहे.

## मुंबईतून मुलं होतायेत बेपत्ता; ३६ दिवसात ८२ मुलं रहस्यमयरित्या गायब

**मुंबई/** पालकांची चिंता वाढवणारी बातमी मुंबईमधून समोर येत आहे. मुंबई पोलिसांनी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, १ नोव्हेंबर ते ६ डिसेंबरदरम्यान शहरामधून ८२ मुलं बेपत्ता झाली आहेत. ३६ दिवसांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात मुलं बेपत्ता झाल्याने हा विषय अधिक चिंताजनक झाला आहे. पोलिसांनी या प्रकरणामध्ये तक्रारी नोंदवून घेत तपास सुरु केला आहे. मात्र पोलिसांच्या हाती काय लागलं आहे याची माहिती जारी करण्यात आलेली नाही.

**दररोज किती मुलं बेपत्ता होतात?**

३६ दिवसांत मुंबईत ८२ मुले आणि युवक-युवती बेपत्ता झाले आहेत. यापैकी ६० मुली आहेत. 'मिड डे'ने काही स्रोतांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, यातील बहुतेक मुलं १८ वर्षांच्या आसपासची आहेत. बेपत्ता ८२ मुलांपैकी ५४ जण १८ वर्षांचे आहेत.

नोव्हेंबर ते डिसेंबरच्या सुरुवातीपर्यंत बेपत्ता मुलांची संख्या वेगाने वाढली आहे. दररोज सरासरी दोन ते तीन मुले बेपत्ता होत असल्याचे आकडेवारीमधून दिसून येत आहे. नवी मुंबईतही अपहरणाच्या




तक्रारी वाढल्या असून जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत ४९९ मुले बेपत्ता झाल्याची नोंद आहे. मुलं बेपत्ता होण्याच्या तक्रारी मुंबईतील वेगवेगळ्या भागांमधून नोंदवण्यात आल्या आहेत.

**मानवी तस्करी किंवा अपहरणाची शक्यता?**

बहुतेक प्रकरणांमध्ये कौटुंबिक कलह, प्रेम प्रकरणे किंवा घर सोडून जाणे हे कारण असू शकते, असं मानलं जात आहे. मात्र, मानवी तस्करी किंवा अपहरणाची शक्यता नाकारता येत नाही. पोलिसांनी सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. काही सोशल मीडिया पोस्टमधून अफवा पसरल्या जात असून, अफवांना बळी न पडण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**सीसीटीव्ही आणि टास्ट फोर्सची मागणी**

मुंबई पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून, तपास सुरू आहे. किती मुले सापडली याची अद्याप अधिकृत आकडेवारी नाही, पण मागील वर्षांत ९६% प्रकरणे सोडवली गेली आहेत. मुलं बेपत्ता होण्याचा प्रमाण वाढत असल्याने विशेष टास्क फोर्स किंवा सीसीटीव्ही अपग्रेडची मागणी पालकांकडून होताना दिसत आहे.

**वर्षातील पहिल्या १० महिन्यांमधील धक्कादायक आकडेवारी**

गेल्या दहा महिन्यांत (जानेवारी ते ऑक्टोबर २०२५) मुंबई शहरात अल्पवयीन मुलींच्या अपहरणाचे ११८७ गुन्हे नोंद झाले आहेत. यापैकी १११८ गुन्ह्यांचा उलगडा झाला असून, दररोज सरासरी चार ते पाच मुली बेपत्ता होत आहेत. जानेवारीमध्ये १२६, तर मार्च, ऑगस्ट आणि ऑक्टोबरमध्ये प्रत्येकी १३६ गुन्हे नोंदले गेले आहेत. याशिवाय, २०२४ मध्ये एकूण १२२६ अपहरण गुन्हे घडले, ज्यात ११४२ उलगडले.

## ३ महिन्यात फक्त ९८ कुणबी प्रमाणपत्र, हैद्राबाद गॅझेटच्या निर्णयाचा फायदा होतोय की नाही?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** गेल्या तीन महिन्यात मराठवाड्यातील केवळ ९८ जणांना ओबीसी प्रमाणपत्र मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर २ सप्टेंबर रोजी निघालेल्या हैदराबाद गॅझेटियर जीआरनुसार मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात तीन महिन्यांमध्ये मराठा समाजाला केवळ ९८ कुणबी ओबीसी प्रमाणपत्रे मिळाली आहेत. त्यामुळं अवघी मुंबई जॅम करीत जरांगेंनी हैद्राबाद गॅजेटसाठी केली धडपड व्यर्थ गेली का असा प्रश्न उपस्थित होतोय.

अवघ्या महाराष्ट्राने ७ दिवस मुंबईत धडकलेल्या जरांगेंच्या आंदोलनाचा झंझावात बघितला. त्यानंतर हैद्राबाद गॅझेटची मागणी मान्य करत सरकारला जीआर काढावा लागला. त्यानंतर मराठा आंदोलकांनी आंदोलन मागे घेत एकच जल्लोष केला. कुणबी नोंदींचा मराठा समाजाला मोठ्या प्रमाणात फायदा होईल अशी भावना तयार झाली. पण गेल्या ३ महिन्यात फक्त ९८ जणांनाच या गॅझेटच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळू शकलंय.

**मराठवाड्यात किती कुणबी प्रमाणपत्रांचं वाटप?**

कुणबी प्रमाणपत्रासाठी एकूण ५९४ अर्ज




परभणी जिल्ह्यातून सर्वाधिक ४४५ अर्ज, ४७ जणांना प्रमाणपत्र

संभाजीनगर जिल्ह्यातून १४ अर्ज, एकालाही प्रमाणपत्र नाही

जालना जिल्ह्यातून ७८ अर्ज, ८ जणांना प्रमाणपत्र

बीड जिल्ह्यातून २२ अर्ज, सर्वांना प्रमाणपत्र वाटप

धाराशिव जिल्ह्यातून १३ अर्ज, ४ जणांना प्रमाणपत्र

लातूर जिल्ह्यातून १२ अर्ज, ९ जणांना प्रमाणपत्र

नांदेड जिल्ह्यातून ५ अर्ज, सर्वांना प्रमाणपत्र वाटप

हिंगोली जिल्ह्यातून ५ अर्ज, ३ जणांना प्रमाणपत्र

मराठवाड्यातील मराठा समाजाला सरकारच्या निर्णयाचा मोठा फायदा होईल असं म्हटलं जात असतानाच ही आकडेवारी मात्र त्याला छेद देतेय. यावरुनच जरांगेंनी सरकारवर निशाणा साधलाय. तर यात नेमक्या काय अडचणी आहे ते आम्ही समजून घेऊ असं विखेंनी म्हटलंय.

## म्हाडा लॉटरीतील प्रकल्पाला महारेराची स्थगिती

### स्थगितीनंतरही मुंबई मंडळाकडून तात्पुरते देकारपत्र; कर्ज न मिळाल्याने विजेते अडचणीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** म्हाडाच्या मुंबई मंडळाने २०२४ मध्ये काढलेल्या लॉटरीत विजेते ठरलेल्या दिंडोशी येथील शिवधाम कॉम्प्लेक्स (संकेत क्र. ४७६) प्रकल्पातील नागरिकांना तब्बल एक वर्षांनंतर घराची रक्कम भरण्यासाठी तात्पुरते देकारपत्र पाठविण्यात आले आहे. मात्र या प्रकल्पावर महारेरा (RERA) यांनी खरेदी-विक्रीसाठी स्थगिती दिल्याने विजेत्यांना बँकांकडून कर्ज मिळत नाही आणि ते मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

म्हाडा मंडळाने पाठविलेल्या देकारपत्रानुसार विजेत्यांनी घराच्या एकूण किमतीपैकी २५ टक्के रक्कम ४५ दिवसांत भरणे बंधनकारक आहे. ही रक्कम ठरावीक मुदतीत न भरल्यास व्याजासह १५ दिवसांची अतिरिक्त मुदत मिळते; मात्र त्यानंतर थकबाकी भरली नाही तर पूर्वसूचना न देता घराचे वितरण रद्द करण्याचा नियम आहे.

**महारेराची स्थगिती समोर आल्यानंतर बँकांचा नकार**

विजेत्यांनी काही प्रारंभिक रक्कम भरून कर्जासाठी बँकांकडे अर्ज केले. मात्र बँकांनी प्रकल्पाची कायदेशीर स्थिती तपासताना त्यावर महारेराची स्थगिती असल्याचे आढळले.म्हणून स्थगिती उठेपर्यंत कर्ज मंजूर करणे शक्य नसल्याचे बँकांनी स्पष्ट केले आहे.यामुळे विजेत्यांना २५ टक्के रक्कम भरणे अशक्य बनले असून, कर्ज बंद झाल्याने संपूर्ण प्रक्रिया अडचणीत आली आहे.

स्थगिती उठल्यानंतर किमान ३० दिवसांची मुदत द्यावी - विजेत्यांची मागणी




विजेत्यांच्या मते:मंडळाने स्थगिती असलेल्या प्रकल्पाला देकारपत्र देणे म्हणजे अन्याय.स्थगिती उठल्यानंतर किमान ३० दिवसांची नवीन मुदत देण्यात यावी. अन्यथा अनेकांना घरच गमवावे लागू शकते.

ऑक्टोबर २०२४ च्या लॉटरीत एकूण २०३० घरे उपलब्ध करून देण्यात आली होती.

त्यातील भोगवटा प्रमाणपत्र असलेल्या घरांचा ताबा त्वरित देण्यात आला, मात्र बांधकामाधीन प्रकल्पांपैकी शिवधाम कॉम्प्लेक्सची प्रक्रिया महारेरा स्थगितीमुळे अडकल्याचे समोर आले आहे.

## चार तहसीलदारांसह १० जण एकाचवेळी निलंबित; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कारवाईचे आदेश

**पुणे/** पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात वनीकरणासाठी राखीव असलेल्या क्षेत्रात झालेल्या ९० हजार ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खननाप्रकरणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कठोर भूमिका घेतली. या गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या चार तहसीलदार, चार मंडल अधिकारी आणि दोन तलाठी अशा नऊ जणांचे निलंबन करण्यात आले.

परवानगीपेक्षा ९० हजार ब्रास अधिक उत्खनन झाल्याचे ईटीएस मोजणीत निष्पन्न झाले असून, यावर फौजदारी व महसूली अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. आमदार सुनील शेळके यांनी मावळ येथील उत्खनन गैरव्यवहाराबाबत आज विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. उत्खनन प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असून, अधिकारी आठ महिने टाळाटाळ करत अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप शेळके यांनी केला होता.

**विभागीय आयुक्तांच्या चौकशीत निष्पन्न**

महसूल मंत्र्यांनी सांगितले की, विभागीय आयुक्तांनी दोनदा चौकशी केली. गट क्रमांक ३६, ३७, आणि ३८ मध्ये खाणपट्टे मंजूर होते, मात्र ३५, ४१, ४२, आणि ४६ या गट क्रमांकांवरही गौण खनिजाचे तात्पुरत्या स्वरूपाचे उत्खनन झाले आहे. ईटीएस मोजणीमध्ये ३ लाख ६३ हजार ब्रासची परवानगी असताना तब्बल ४ लाख ५४ हजार ब्रास उत्खनन झाल्याचे आढळले. म्हणजेच, ९० हजार ब्रास जास्तीचे उत्खनन झाले आहे.

**निलंबित अधिकाऱ्यांची नावे**

गैरव्यवहारात कर्तव्यात कसूर केल्याबद्दल निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तलाठी (२): दीपाली सनगर आणि गजानन सोटपल्लीवार. मंडळ अधिकारी (४): संदीप बोरकर, माणिक साबळे, अजय सोनवणे आणि रमेश कदम. तहसीलदार (४): जोगेंद्र कटियार, मनजीत देसाई, मधुसूदन बारगे, विक्रम देशमुख. (या काळात कार्यरत असलेले चार तहसीलदार.)

९० हजार ब्रास जादा उत्खननासाठी संबंधितांवर गुन्हा दाखल करणे, दंड आकारणी करणे, सातबारा उताऱ्यावर नोंदी घेणे आणि दंड न भरल्यास व्याजासह वसूल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निलंबित अधिकाऱ्यांची तीन महिन्यांत विभागीय चौकशी पूर्ण करून त्याचा अहवाल आगामी अधिवेशनात पटलावर ठेवला जाईल, असे महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले.

**वनिकरणाचा मुद्दा**

आमदार शेळके यांनी वनीकरणासाठी राखीव असलेल्या क्षेत्रात उत्खनन झाल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर बोलताना महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार ती खाजगी जमीन आहे. गुगल इमेजमध्ये फक्त १५ झाडे होती आणि ती तोडण्यासाठी परवानगी घेण्यात आली होती. महसूल मंत्र्यांनी सांगितले की, वन अधिकाऱ्यांनी हा 'फॉरेस्ट झोन' नसल्याचे लेखी कळवले आहे, म्हणूनच खाणपट्ट्याला परवानगी मिळाली. तथापि, पीएमआरडीएच्या प्रस्तावीत विकास आराखड्यात (झोंशिव उद्म) ही जमीन खाजगी वनीकरणासाठी राखीव दर्शवण्यात आली आहे. यासंदर्भात अधिक माहिती असल्यास स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा करण्याची तयारी मंत्र्यांनी दर्शविली.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यभरातील अवैध उत्खननाला लगाम लावण्यासाठी प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावाचा ईटीएस सर्वे सुरू करण्यात आला आहे. यामुळे किती परवानग्या दिल्या आणि किती अवैध उत्खनन झाले, याची माहिती मिळेल व त्यानुसार दोषींवर कारवाई केली जाईल.



# अवैध होर्डिंग्ज राजकीय पुढाऱ्यांचे शुभचिंतक का लावतात, त्यांना कोणीच ओळखत नाही काय?

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनदरम्यान वर्धा मार्गावरील मेट्रोच्या खांबावर ६० पेक्षा अधिक अवैध होर्डिंग्ज लावण्याची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने घेतली आहे. न्यायालयाने महापालिकेला शहरातील सर्व अवैध होर्डिंग्ज २४ तासांच्या आत हटवण्याचे कठोर आदेश दिले आहेत याचे मनापासून स्वागत.तसेच आयुक्तांनी अवैध होर्डिंग्ज काढण्याच्या कारवाईचा अनुपालन अहवाल सादर करावा लागेल,असेही आदेश नमूद केले. म्हणजे राजकीय पुढारी चांगल्या व स्वच्छ शहराला विद्रुपिकरण करतांना दिसतात त्यामुळे न्यायालयाने अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.आपण जेव्हा स्वच्छ नागपूर, स्वच्छ शहर, स्वच्छ राज्य म्हणतो तेव्हा अशा परिस्थितीत नेत्यांच्या स्वागतासाठी शहरभर पोस्टर्स,बॅनर्स,कट-आऊटस व होर्डिंग्ज लावण्याची काय गरज? राज्यातील पुढाऱ्यांचे होर्डिंग्ज लावने म्हणजे यांना कोणीच ओळखत नाही का?त्यामुळे तर होर्डिंग्ज लावत असावेत असे तर नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो.एका शब्दात सांगायचे म्हणजे आपण यांना पाहिलत काय असेच काही असावे असे मला वाटते.अवैध होर्डिंग्जचा कायदा अनेक वर्षांपासूनचा आहे तरी राजकीय पुढारी नियमांची पायमल्ली करून स्वतःच्या प्रसिद्धीसाठी संपूर्ण नियम धाब्यावर ठेवतात हे कसले लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी यांना तर जनता निवडून देते यांना राज्याला किंवा शहराला ओळख दाखविण्याची गरजच काय? त्यामुळे यांना कशाला हवी प्रसिद्धी आणि आपल्या प्रसिद्धीसाठी संपूर्ण नियम धाब्यावर ठेवतात हा तर लोकशाहीचा,सर्वसामान्यांचा, कायद्याचा व नियमांचा मोठा अपमानच म्हणा-वा लागेल. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या नेत्यांच्या स्वागतासाठी शहरात अवैध होर्डिंग्ज लावण्यात आले यावर दिनांक १० डिसेंबर बुधवार-ला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा जोरदार दणका बसला या होर्डिंग्ज बहादरांना कारणे दाखवा नोटीस बजावून प्रत्येकी पाच लाख रुपये उच्च न्यायालयात जमा करण्याचे निर्देश का दिले जाऊ नये,अशी विचारणा करावी,असा आदेश न्यायालयाने महानगरपालिका आयुक्तांना दिला.मी तर म्हणनेल की ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे अवैध होर्डिंग्ज दिसत असेल अशांच्या आमदारकीवर लगाम कसली पाहिजे व शुभचिंतक व राजकीय पुढारी यांच्यावर पाच लाख रुपये नाही,तर १० लाख दंड आकारला पाहिजे.तेव्ह-ाच राजकीय पुढाऱ्यांमध्ये व शुभचिंतकामध्ये सुधारणा होईल.आपणाला कल्पना असेल की राज्यामध्ये अवैध होर्डिंग्जच्या अनेक जिवघेण्या घटना झाल्या आहेत ही बाब माहीत असुनही अवैध होर्डिंग्ज लावतात ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे.यामध्ये मुंबई परिसरात घाटकोपर येथे दिनांक १३ मे २०२४ ला वादळीवारा व पाऊस आला यामध्ये मोठ्या प्रमाणात मुंबईकरांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे स्थानिक प्रशासन व सरकारच्या हलगर्जीपणामुळे मुंबईत असलेल्या अवैध होर्डिंग्जने १४ मुंबईकरांचा बळी घेतला व ८० पेक्षा जास्त गंभीर जखमी झालेत होते.त्याचीच पुनरावृत्ती दिनांक २ ऑगस्ट २०२४ ला ठाणे जिल्ह्यातील कल्याणमध्ये सहजानंद चौकात एक भलेमोठे होर्डिंग्ज ४० फुट उंचीवरून कोसळले होते यात दोन जण गंभीर जखमी झाले होते. अशीच घटना कल्याणमध्येही होर्डिंग्ज कोसळल्याने झाली होती.त्यामुळे अवैध होर्डिंग्जच्या बाबतीत प्रश्न निर्माण होतो की,नागरिकांचा जीव कवडीमोलाचा झाला आहे का?त्यामुळे सरकारने, प्रशासनाने अवैध होर्डिंग्जच्या बाबतीतील गांभीर्य लक्षात घेऊन होर्डिंग्ज मालकांवर,शुभचिंतकावर व राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. कोणतेही अवैध होर्डिंग्ज असो त्याचे गंभीर परिणाम सामान्य नागरिकांना भो-गावे लागतात.अवैध होर्डिंग्ज लावणाऱ्यावर सरकारने व प्रशासनाने कठोर कारवाई करावी जेणेकरून भविष्यात होर्डिंग्जनी होणाऱ्या दुर्घटना रोखण्यास प्रशास-नाला मोठी मदत होईल व विद्रुपीकरण टाळता येईल यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

महापालिका किंवा प्रशास-नाने जाहिरातदारांना किंवा राजकीय पुढाऱ्यांना अवैध होर्डिंग्जबद्दल नोटीस बजावुन सुध्दा होर्डिंग्ज हटवत नसेल तर कठोर कारवाई झालीच पाहिजे. अवैध होर्डिंग्जवरून असे लक्षात येते की राजकीय पुढारी,जाहिरातदार व मनपा प्रशासन यात काही साठगाठ तर नाही ना!अशी शंका सर्वसामान्य नागरिकांच्या मनात नेहमीच भेडसावत असते.वाहतूक सिग्नलसह दिशादर्शक व सावधानतेचा इशारा देणाऱ्या फलकांवर किंवा त्याजवळ होर्डिंग्ज लावल्यास वाहनचालकांचे लक्ष विचलित होते त्यामुळे त्यांचे अपघात होतात.तसेच अवैध होर्डिंग्ज शहराचे आणि देशा-चे विद्रुपीकरण करते. वाहनचालकाचे होर्डिंग्जकडे जेव्हा अचानक लक्ष जाते तेव्हा मोठ्या दुर्घटना होण्याची शक्यता असते आणि अशाप्रकारच्या दुर्घटना सुध्दा झाल्या आहेत.

या संपूर्ण घटनांची दखल राजकीय पुढारी,जाहिरातदार, शुभेच्छा देणारे नेते यांनी घेतली पाहिजे.देशाला,राज्याला व शहरांना स्वच्छ व सुंदरतेच्या दिशेने न्यायचे असेल तर होर्डिंग्जच्या बाबतीत राजकीय पुढारी व जाहिरातदार यांच्या मुसक्या आवळणे अत्यंत गरज-चे आहे आणि त्या दिशेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वाटचाल सुध्दा सुरू केली आहे. त्यामुळेच शहरातील चोवीस तासांत २८०३ अवैध होर्डिंग्ज हटले.अशीच कारवाई संपूर्ण राज्यात सन्माननीय उच्च न्यायालयाने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो. जय हिंद.

# मुक्त विद्यापीठाच्या रोजगार मेळाव्यात ३७५ जणांना रोजगार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक /प्रतिनिधी/** यशवंतराव चव्ह-ाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आयोजित पहिल्या रोजगार मेळाव्यात ३७५ जणांना रोजगार मिळाला.



त्यापैकी ६२ जणांना मेळाव्याच्याच ठिकाणी 'ऑन द स्पॉट' नियुक्तीपत्रे दिली गेली. हा मेळावा विद्या-पीठ आणि युवाशक्ती फाऊंडेशन (नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ मुख्यालयातील कृषी विज्ञान केंद्रात संपन्न झाला.

मेळाव्यात नाशिक, सिन्नर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, चाकण, पुणे, कांदिवली (मुंबई), रत्नागिरी आणि गोवा येथील २३ नामांकित व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी उद्घाटन करताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धो-रणानुसार शिक्षण व रोजगाराबद्दल माहिती दिली. त्यांनी युवकांनी अनुभव आणि कौशल्य मिळवून भविष्यात नोकरीदाता व्हावे असे आवाहन केले. युवाशक्ती फाऊंडेशनचे संचालक डॉ. सतीश पवार यांनी खाजगी क्षेत्रात नोकऱ्या भरपूर असल्या तरी कुशल नोकरदारांची कमतरता असल्याची खंत व्यक्त केली.

मेळाव्यात निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्र - कुलगुरू व प्रमुख अतिथींनी दिली. या कार्यक्रमात विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक, विभागीय संचालक, विविध प्राध्यापक आणि युवाशक्ती फाऊंडेशनचे अधिकारी उपस्थित होते.मेळाव्यासाठी १८ ते ३५ वर्ष वयोगटातील सर्व शाखेतील पदवीधर, आय.टी.आय. (सर्व ट्रेड्स), डिप्लोमा, इंजिनिअरिंग (इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल), सी.एन.सी. ऑपरेटर, सीपेट (उखझएढ) शिक्षण पूर्ण केलेले तसेच दह-ावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने हजर होते.

# कुत्र्या मांजराचे जगण्यापेक्षा सरकारने आम्हाला गोळ्या घालून ठार मारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये,राज्यातील महापालिकांना पादचाऱ्यांची सुरक्षा अंतर्गत नियमावलीचे निर्देश दिले आहेत.राज्य शासनाच्या निर्देशानुसार,मुंबई महानगरपालिकेने संपूर्ण मुंबईत रस्त्याशेजारी आणि उघड्यावर राहणाऱ्या श्रमिक बेघर नागरिकांचे मोठ्या प्रमाणात निष्कासन कारवाई चालू केलीआहे. त्याच बरोबर मुंबई पोलिसांनी सुद्धा रस्त्यावर राहणाऱ्या श्रमिकांना मुंबई भिक्षेकरी प्रतिबंध कायद्याअंतर्गत अटक करून भिकारी बनवले आहे.

दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी चिकूवाडी बोरिवली पश्चिम येथील मुंबई महापालिकेच्या नालेसफाईची कामे करून आत्मसन्मानाने जगणाऱ्या ५५ पारधी समाजातील कुटुंबांच्या झोपड्यांवर अतिशय निर्दयतेने कारवाई करीत थंडीच्या दिवसांमध्ये या पारध्यांना बेघर केले.एकीकडे महाराष्ट्र शासन,शासन निर्णयान्वये थंडीच्या दिवसात रस्त्यावर राहणाऱ्या बेघरांची काळजी घेण्याबाबत महापालिकेंना निर्देश देते.मात्र दुसरीकडे मुंबई महापालिका या शासन निर्णयाविरोधात जाऊन थंडीच्या दिवसात उघड्यावर,रस्त्याच्या शेजारी आणि नाल्या शेजारी राहणाऱ्या भटके विमुक्त समाजातील पारधी कुटुंबियांच्या झोपड्यांची तोडमोड करीत आहे.

मुंबई महापालिका आर सेंट्रल विभागाच्या तोडक कारवाईमुळे बोरिवली चिकूवाडी नाल्याच्या शेजारी राहणाऱ्या पारधी समुदायातील २५ शाळेत जाणाऱ्या मुलांचे सुद्धा नुकसान झाले आहे.ते शाळेत जाऊ शकत नाहीत.या तोडक कारवाईमुळे हे भयभीत झालेला पारधी श्रमिक रोजगाराला सुद्धा जाऊ शकत नाही आणि थंडीच्या दिवसात आसऱ्यासाठी आप-ली मुलं वयस्कर आई बापांसोबत वणवण भटकत आहे. यात तोडक कारवाईमुळे कॅन्सर पीडित जेष्ठ नागरिक,७ दिवसाची,१ महिन्याची आजारी मुलं आणि अनेक वयस्कर नागरिकांची दैना झाली आहे. चिकूवाडीतील पारधी श्रमिक मुंबईतील नालेसफाई चे काम,रस्ता सफाई,अगदी गणेशोत्सवाच्या काळात कृत्रिम तलाव बनवण्याचे काम करून महापालिकेला एक प्रकारचे सहकार्य देत आलेले आहेत. त्याबरोबर,दत्तानी पार्क बस स्टॉप शेजारी,कांदिवली पूर्व या ठिकाणी मागील १५ वर्षापासून वास्तव्यास असलेल्या पारधी कुटुंबांना गेल्या वर्षभरापासून येथील महापालिका आणि पोलीस अधिकारी बसू देत नाही,त्यांचे जेवणाचे,चुलीचे सामान ला- ... जात.बोरिवली ... डॉन बॉस्को शाळेसमोरील तसेच बोरिवली एमटीएनएल ऑफिस समोरील श्रमिक बेघरांना,तसेच विलेपार्ले स्टेशन जवळील राहणाऱ्या श्रमिकांना अटक करण्याचे धमकावून भयभीत केले जात आहे.

**कृष्णा डायग्नोस्टिक लि. केज उत्कृष्ट आर-ोग्य सेवेबद्दल एन ए बी एच कडून सन्मानित**



१.)थंडीच्या दिवसात महापालिकेद्वारे होणारे तोडमोड कारवाई त्वरित थांबवण्यात यावी.

२) मुंबई पोलिसांद्वारा भिक्षेकरी कायद्यांतर्गत रस्त्यावरील श्रमिकांची होत असलेली अटक ताबडतोब थांबविण्यात यावी.

३)या अत्याचारी कारवाईत सामील सर्व मुंबई पोलिस आणि मुंबई मनपा अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

४) माननीय प्रधानमंत्री यांच्या स्वप्नातील योजने नुसार बेघरांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ३ किलोमीटरच्या परिघात या सर्व कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात यावे.

५) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार,श्रमिक बेघरांसाठी कौटुंबिक निवारा अथवा प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांना त्याच ठिकाणी वास्तव्यास मुभा द्यावी आणि महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार मूलभूत सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा.अशा मागण्या मांडण्यात आल्या.

**-जगदीश पाटणकर समन्वयक पाणी हक्क समिती**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पादचारी सुरक्षेसाठी मुंबई पोलीसानी दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी दत्तानी पार्क कांदिवली हायवे शेजारी राहणाऱ्या पाच श्रमिक पारध्यांना रोजग-ाराचे आमिष दाखवत पोलिस स्थानकात घेऊन गेले आणि मुंबई भिक्षेकरी कायद्याअंतर्गत भिकारी म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. त्यांना अटक करून न्यायालयात नेल्यावर तिथे त्यांना प्रत्येकी २१०० रुपयांचा दंड आकारून गुन्हेगार भिकारी म्हणून त्यांची नोंद करण्यात आली आणि या प्रमाणिक श्रमिकांच्या आत्मसन्मानाला ठोकर मारली आहे.मुंबई महापालिकेच्या तोडक कारवाई आणि पोलिसांच्या अमानवी छळाच्या दहशतीतील पीडित गीता काळे यांनी आम्ही या देशाचे नागरिक नाही का? पारधी म्हणून आम्हाला काय जगण्याचा अधिकार देणार आहात की नाही? आम्हाला गोळ्या घाला नाही तर लटकावा असे उदवेगपणे सांगितले.

विलेपार्ले येथील सुनिता यांनी सांगितले की कुत्र्या मांजराचे जगण्यापेक्षा सरकारने आम्हाला गोळ्या घालून ठार मारावेत.आम्ही भीक मागत नाही तर आम्ही श्रम करतोय,आम्हाला आमचे अधिकार पाहिजेत.आम्हाला सोई सुविधा आणि घराचा अधिकार सुद्धा पाहिजे. घराचे पैसे द्यायला लागले तरी पण आम्ही मेहनत करून द्यायला तयार आहोत.

बोरिवली एमटीएनएल ऑफिस समोर राहणाऱ्या आशा दुबे यांनी सांगितले की,नववी दहावीत माझी शिकणारे मुलं आज पोलिसांच्या आणि बीएमसीच्या भीतीमुळे शाळेत जात नाहीत.माझी पुरी जिंदगी रस्त्यावरती गेली पण मला माझ्या मुलांची जिंदगी रस्त्यावर घालवायची नाही तर त्यांना शिक्षण द्यायचं आहे.सरकारने शिक्षणाचा अधिकार तरी नाकारू नये अशी विनंती केली.मुंबई भिक्षेकरी कायद्यान्वये अटक केलेल्या दिलीप काळे याने सांगितले की पोलीस स्टेशन मध्ये काम असे सांगून नेले मात्र आम्हाला अटक करून भिकारी बनवले. रोजगार तर मिळाला नाही उलट २१०० रुपयांचा दंड सुद्धा भरून भिकारी म्हणून भिक्षेकरी गृहात एक दिवस राहावं लागल्याची खंत बोलून दाखवले.मानव अधिकार चवळीतील कार्यकर्ते एडवोकेट रहिमत यांनी त्यांचा अनुभव सांगताना सांगितले की भिक्षे करू कायद्याचा बळी हा नेहमीच पारधी समाजातील लोकांचा होत आला आहे पारधी समुदायासाठी रेणके आयोग इदा त्या आयोगाने सुचवलेल्या शिफारशी जर शासनाने लागू केल्या तर रस्त्यावरती एकही पारधी दिसू शकणार नाही असे सांगितले.

पाणी हक्क समितीचे समन्वयक जगदीश पाटणकर यांनी सरकार एका बाजूला रस्त्यावरच्या उघड्या उघड्यावर रस्त्यावरील लोकांच्या थंडीपासून संरक्षणासाठी जीआर काढते तीच मुंबई महानगरपालिका थंडीच्या दिवसात श्रमिकांना वाऱ्यावर सोडते. हा शासनाचा भटके विमुक्त सोबत दुजाभाव असल्याचे सांगतात.

आजच्या पत्रकार परिषदेमध्ये मुंबईतील पारधी समुदायावर होत असलेल्या अत्याचारा संदर्भात माध्यमानसमोर येऊन लोकांनी आपल्या व्यथा मांडल्या त्याचबरोबर खालील मागण्या सुद्धा मांडण्यात आल्या.

# बांधकाम कामगार कार्यालयाचा ढिसाळ कारभार

**-कामगार आयुक्तांचा खोडसाळपणा वडार जमातीला नाकारली कामगार योजना..**

**-आयुक्तांवर गुन्हा दाखल करून चौकशी करण्याची मागणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**लातूर / प्रतिनिधी/** बांधकाम कामगारांच्या हितास्तव शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात मात्र या योजना बऱ्याचदा एज़ंट,दलालांमार्फत राबविल्या जात असल्यामुळे खरा लाभार्थी मात्र दुर्लक्षितच राहतो आहे.हाच एक चिंतनशील प्रश्न बनला आहे.त्यातच कौशल्य विकास वृद्धी कामगार प्रशिक्षण योजना संदर्भात रितसर निवेदन देऊन,मागणी करूनही लातूर कामगार कार्यालयाच्या वतीने शहरी आणि ग्रामीण भागातील वडार जमातीला ही योजना नाकारली यातून ला-तूर कामगार आयुक्तांचा कर्तव्यपराडमुखता तसेच सहाय्यक कामगार आयुक्त यांचा खोडसाळपणा दिसून येतो.यामुळे लातूर जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त यांच्यावरती गुन्हा दाखल करून चौकशी करण्यात यावी,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भटक्या- विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ,महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्रीकांत मुद्दे म्हणाले की,सरकार म्हणते शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहा-चवा मात्र लातूरच्या बांधकाम कामगार सहाय्यक आयुक्तांची कृती मात्र याच्या उलट असलेली दिसून येते.कौशल्य वृद्धी विकास कामगार प्रशिक्षण योजना ही योजना चालू होण्याच्या आधीपासून वडार समाज संघाच्या वतीने निवेदनाद्वारे आयुक्तांकडे सातत्याने मागणी करण्यात आली होती.तसेच कामगारांची यादी सुद्धा देण्यात आली होती.मात्र वारंवार मागील चार महिन्यांपासून कामगार कार्यालयाचे हेलपाटे मारल्यानंतरही आयुक्त साहेब यांनी दिलेल्या निवेदनावरती काहीच कार्यवाही केली नाही.कंत्राटदार म्हणतो,वडार जमातीतील यादीस कामगार आयुक्त योजनेस मंजुरी देत नाहीत. तेव्हा आम्ही प्रशिक्षण योजना कशी राबवायची? संवैधानिक पदावरील व्यक्तीकडून जर जे खरे लाभार्थी आहेत,शासकीय योजनांपासून कोसो दूर आहेत,अशा उपेक्षित,वंचित,दुर्लक्षित घटकांसाठीची असलेली योजना नाकारणे म्हणजे संविधानातील हक्क,अधिकार आणि मूल्यांची पायमल्ली करणे होय.

याच्या आधीही कामगारांसाठी राबवल्या जाणाऱ्या सुरक्षा संच आणि भांडी संच याचे वडार वस्तीत कँप घेऊन मोफत वाटप करावे यासाठीदेखील निवेदनाद्वारे सातत्याने मागणी करण्यात आली होती.मात्र आयुक्त साहेबांनी त्यांच्या मर्जीतील लोकांना अनेक भागात तारीख देऊन कँप घेत-ले मात्र वडार वस्तीत कँप घेण्यास तारीख दिली नाही.त्याचप्रमाणे वडार जमातीतील कामगार नोंदणी अर्ज आणि शिष्यवृत्ती अर्ज काही बोटावर मोजण्या इतकेच कामगार अर्ज दाखल करतात.मात्र



या अर्जांचाही दहा ते बारा महिने झाले तरी असे अर्ज निकाली काढले जात नाही. शेवटी काहीना काही त्रूटी काढून लाभ कसा नाकारला जातो,याचे कार्यालयातील अधिकारी आणि कामगार आयुक्त यांना निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील यावर कसलीच कार्यवाही करण्यात आली नाही. याला काय म्हणावे? अशा अनेक योजनांविषयी मागील चार वर्षापासून निवेदने देऊनही वडार समूहातील कामगारांना फसवण्याचे काम कामगार कार्यालय करत आले आहे. हे पुराव्यानिशी दाखवून देऊ. असेही यावेळी म्हणाले.

लातूर जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्तांचे वारंवारचे म्हणणे आहे की, वडार जमातीला योजना मिळवून देऊ,रितसर मागणी करा,टाळाटाळ करणे, कोटा संपला आहे म्हणणे,दादागिरीची भाषा करणारा अधिकारी वडार समाजातील कामगारांचे प्रश्न सोडवेल का? हाच चिंतनशील प्रश्न बनला आहे. कामगार म्हणून वडार समाजाच्या योजनांना मंजुरी देत नसतील तर संबंधीत कामगार आयुक्त यांच्यावर बांधकाम कामगार लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यास नकार दिल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच या योजनेची सखोल चौकशी करण्यात यावी आणि लातूरचा कामगार कारभारी बदल-ावा तसेच सदर निर्णय शासन निर्देश,बांधकाम कामगार कल्याण मंडळ नियम व प्रशासनिक प्रक्रियेचे उल्लंघन करणारा आहे. नियमांनुसार योजनेस नकार देताना योग्य कारण लेखी स्वरूपात देणे बंधनकारक असते.मात्र तसे न झाल्याने निर्णय मनमानी स्वरूपाचा वाटतो.सदर प्रकरण गांभीर्याने घेऊन योग्य ती कारवाई करून न्याय मिळवून द्यावा असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ,महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. याप्रसंगी रमाकांत मुद्दे,कृष्णा धोत्रे,सचिन वाडीकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार योजनेच्या अध्यक्षपदी सौ.पुनमताई पवार यांची नियुक्ती !

**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद/ गंगाप्रसाद सोनकांबळे/** गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असलेल्या व अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आधारित असलेल्या संजय गांधी निराधार समिती योजनेच्या अध्यक्षपदी आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.पुनमताई पवार यांची शासनाने नियुक्ती केली आहे.

शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग समिती, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, तद्वतच माननीय मंत्री, इतर मागास, बहुजन कल्याण, दुग्धविकास अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय मुंबई यांच्या पत्राअन्वये तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या शिफारसी प्रमाणे संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या धर्माबाद तालुका अध्यक्ष व सदस्य पदांची कार्यकारणी नुकतीच शासनातर्फे जाहिर करण्यात आली.



या समिती मध्ये अध्यक्ष म्हणून सौ.पुनमताई पवार तर सदस्य म्हणून दुसऱ्यांदा संजय तुळशीराम कदम यांची नियुक्ती करण्यात आली. तद्वतच व्यंकटेश चिन्नना अबुलकोड, सूर्यकांत नागनाथ मुळे, दत्तात्रय दिगंबर आलूरोड यांचीही अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.उपरोक्त समिती अस्तित्वात येऊन योग्य लोकांना समितीमध्ये स्थान मिळाल्यामुळे धर्माबाद तालुक्यात सर्वत्र कौतुक होत असून निराधाराचे प्रश्न तात्काळ सोडून त्यांना उपरोक्त योजनेद्वारे आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी सर्व सदस्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन नवनिर्वाचित अध्यक्षा पुनमताई पवार यांनी केले असून स्वतः या योजने संदर्भात जातीने लक्ष घालून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्याचा निश्चय त्यांनी केला आहे.

# सांस्कृतिक चळवळ बळकट झाली तरच राजकीय क्रांती होऊ शकेल -संदीप थोरात यांचे मत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**भय्यासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ड. संदीप थोरात यांनी सांस्कृतिक चळवळी आणि राजकीय क्रांती यामधील घट्ट संबंधावर प्रकाश टाकला. त्यांनी स्पष्ट केले की, भय्यासाहेब आंबेडकरांनी केवळ राजकीय बदल घडवण्यावर लक्ष केंद्रित केलेले नाही; तर त्यांनी सांस्कृतिक चळवळेची बळकटीकरण करणे हीही तितकीच महत्त्वाची गोष्ट मानली. महू ते मुंबई पर्यंत भारतभर भीमज्योत काढून, समाजात जागरूकता निर्माण करून आणि आपली सांस्कृतिक प्रतिकं रुजवून त्यांनी ही चळवळ गतिमान केली.थोरात म्हणाले की, भीमज्योत, विहार आणि पुतळ्यांच्या माध्यमातून लोकांना त्यांच्या ओळखीची आणि संस्कृतीची जाणीव करून देणे ही भय्यासाहेबांची प्राथमिक रणनीती होती. या माध्यमातून समाजात आत्मसन्मान वाढविला गेला आणि लोकांनी आपली सांस्कृतिक ओळख गाठली. त्यामुळे तत्कालीन काळात रिपब्लिकन पक्ष भारतभर प्रभावी बनू शकला. त्यांनी नमूद केले की, जो पर्यंत आम्ही आमची सांस्कृतिक प्रतिकं रुजवणार नाही, जो पर्यंत आपली धम्म चळवळ बळकट होणार नाही, तोपर्यंत राजकीय क्रांती साधणे कठीण आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. भारत सिरसाट यांनी भैय्यासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, भैय्यासाहेब १९४४ पासून बाबासाहेबांच्या चळवळीत सक्रिय होते, परंतु तत्कालीन साहित्यिक आणि विचारवंतांनी त्यांचा योग्य तो मान्यता दिला नाही. यावर प्रतिष्ठानाने व्याख्यान, ग्रंथ आणि संशोधनाद्वारे भैय्यासाहेबांच्या कार्याची ओळख लोकांसमोर आणली आहे. त्यांनी विशेषतः सांगितले की, भैय्यासाहेबांच्या कार्यातून आजच्या समाजाला सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्ट्या समृद्ध होण्याची प्रेरणा मिळते. सूत्रसंचालन रतनकुमार साळवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमरदिप वानखडे यांनी मानले. या कार्यक्रमात डॉ. रेखा मेश्राम, अनंत भवरे, राजन कीर्तने, पंडितराव तुपे, डॉ. धनराज गोंडाने, भाऊ पठाडे, मधुकर गवंदे, जितेंद्र भवरे, एल. के. गायकवाड, रामदास अभ्यंकर, मधुकर दिवेकर यांसह विविध सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.




व्याख्यानातून स्पष्ट झाले की, भीम आंबेडकरांच्या धम्म चळवळीचे उद्दीष्ट फक्त सामाजिक समतेपुरते मर्यादित नव्हते, तर ती सांस्कृतिक ओळखीवर आधारित होती. थोरात यांनी उपस्थितांना आवाहन केले की, भैय्यासाहेबांच्या या सांस्कृतिक कार्याची जाणीव ठेवून, समाजात जागरूकता निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. यामुळेच समाजात खरी बदलाची शक्यता निर्माण होईल आणि राजकीय क्रांती साकार होईल.

## संक्षिप्त

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीत आतापर्यंत जिल्ह्याचे योगदान सव्वा तीन कोटी रुपयांचे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** एकमेका साह्य करु अवघे धरु सुपंथ या उक्तिप्रमाणे जिल्हावासीय जिल्ह्यातील अतिवृष्टिग्रस्तांच्या मदतीला धावून आल्याचे चित्र आहे. अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या आपल्या शेतकरी कष्टकरी बांधवांसाठी जिल्ह्यातील विविध संस्था, संघटना, व्यक्तिंनी आतापर्यंत ३ कोटी १६ लाख ६० हजार ८४६ रुपयांचे योगदान मुख्यमंत्री सहाय्यता निधीत दिले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, आज दि.१२ रोजीच्या दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यातून ३ कोटी १६ लाख ६० हजार ८४६ रुपये इतका निधी जमा झाला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यातील सर्व सामाजिक, सार्वजनिक, संस्था, उद्योजक, उद्योग समूह सामान्य जनता यांना आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देत लोकांनी मदतीचा ओघ सुरु केला. उद्योग क्षेत्राने त्यात भरीव योगदान दिले. सीड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संस्थेने १ कोटी रुपये, आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर या संस्थेने एक कोटी रुपये असे योगदान दिले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या मदतीतून ८६ हजार ३०० रुपये जमा करण्यात आले. मराठी अर्थशास्त्र परिषद ३ लाख ६२ हजार, जिल्हा मजूर कामगार सहकारी संघ २ लक्ष रुपये, प्रोफेशन साऊंड ण्ड लाईट असो. ने १ लाख १११ रुपये दिले.संत एकनाथ मंदीर संस्थानाने ५१ हजार रुपये, शेंद्रा कमंगर ग्रामसभा १ लाख ११ हजार रुपये, छत्रपती संभाजीनगर तहसिलदार कार्यालयाने २ लाख १२ हजार ४७५ रुपये, ग्राम औद्योगिक शिक्षण मंडळ २५ लाख रुपये अशा विविध २९ संस्थांनी सर्व मिळून ३ कोटी १६ लाख ६० हजार ८४६ रुपये इतकी देणगी दिली आहे.मुख्यमंत्री सहायता निधीत नागरिकांनी योगदान द्यावे,असे आवाहनही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

### जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि. २९ डिसेंबर पर्यंत हे आदेश अमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### जटवाडा येथे त्रिदिवसीय लघु पंचकल्याणक प्रतिष्ठा व वार्षिक यात्रा महामहोत्सव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**शहरापासून १२ कि.मी. अंतरावरील जटवाडा येथील श्री. १००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्रात त्रिदिवसीय लघु पंचकल्याणक प्रतिष्ठा आणि वार्षिक यात्रा महोत्सव ११ ते १५ डिसेंबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवात संकटहर पार्श्वनाथ भगवंताच्या २८०१ व्या जन्मकल्याणक निमित्त महाअर्चना, महाआरती आणि महामस्तकाभिषेक करण्यात येणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून उपाध्याय श्री १०८ विरंजनसागरजी महाराज व मुनिश्री विसौम्यश्रीसागरजी महाराज ससंघ सहभागी होतील.

संपूर्ण कार्यक्रम सुकांता सुमधुर वैशाली पहाडे यांच्या संगीतमय प्रस्तुतीत पार पडणार आहे. यावेळी उपाध्याय विरंजनसागरजी महाराजांचा ४३ वा अवतरण दिवसही साजरा केला जाणार आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा:

११ डिसेंबर: सायंकाळी ५ वाजता उपाध्याय संघ आगमन.१२ डिसेंबर: सकाळी ८ वाजता घट यात्रा व धर्मध्वजारोहन, मंडप उद्घाटन.१२, १३, १४ डिसेंबर: सकाळी ७ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत लघु पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव.१५ डिसेंबर: वार्षिक यात्रा महोत्सव, सकाळी १० वाजता बोली व ११ वाजता महामस्तकाभिषेक, संध्याकाळी ७ वाजता महाआरती व शास्त्र वाचन.

महोत्सवात स्थानिक समाज व विविध परिवारांनी भगवंताची मूर्ती दान, वेदी शृंगार व महाप्रसाद यासाठी योगदान दिले असून, संपूर्ण कार्यक्रम नमोकार भक्ती मंडळाच्या साग्र संगीतामध्ये पार पडणार आहे.विश्वस्थ मंडळाचे आवाहन आहे की समाज बांधव वार्षिक यात्रेला उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा.

# छत्रपती संभाजीनगर क्षेत्रात GSTR - 3B कर विवरणपत्र पूर्ततेसाठी विशेष मोहीम

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राज्य वस्तू व सेवाकर विभागाच्या छत्रपती संभाजीनगर क्षेत्रातील आठही जिल्ह्यात GSTR - 3B कर विवरणपत्र भरण्यासाठी दि.२० डिसेंबर पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगर क्षेत्रातील ज्या GST करदात्यांचे 3B विवरणपत्र दाखल करण्याचे प्रलंबित असतील त्यांनी हे विवरणपत्र मोहीम कालावधीत दाखल करावेत व पुढील कारवाई टाळावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर क्षेत्राचे अपर आयुक्त (राज्य वस्तू व सेवाकर विभाग) अभिजीत राऊत यांनी केले आहे.वस्तू व सेवाकर कायद्यानुसार नोंदणीकृत करदात्यांनी दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत मासिक GSTR - 3B कर विवरणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे.

मात्र काही कारणांनी ही विवरणपत्र दाखल करावयाची बाकी असल्यास संबंधित करदात्यांनी नोव्हेंबर २०२५ पर्यंतची सर्व प्रलंबित विवरणपत्र दिनांक २० डिसेंबर पर्यंत भरावी असे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

काय आहे ३इ विवरणपत्र

GSTR - 3B हे स्वयं-घोषित (self-declared) मासिक/तिमाही सारांश विवरणपत्र आहे.यात करदात्याने कर दायित्व, RCM² दायित्व आणि उपलब्ध आवक कर वजावट (Input Tax Credit) यांची नोंद करावी लागते. या विवरणपत्राद्वारेच वास्तविक GST भरणा केला जातो.

GSTR - 3B न भरल्यास GSTN प्रणाली मध्ये स्वयंचलित पद्धतीने दंड व व्याज लागू होते. GSTR - 3B विवरणपत्र न भरल्यास रु. ५०००० /-रुपयांपर्यंत शास्ती आकारली जाऊ शकते.

दोन किंवा अधिक विवरणपत्र प्रलंबित असल्यास विशिष्ट प्रकरणांमध्ये बँक खाते गोठवण्याची तरतूद कायद्यात आहे. तसेच सहा विवरणपत्र प्रलंबित असतील तर नोंदणी रद्द करण्याचे प्रावधान आहे.

त्यामुळे GSTR - 3B विवरणपत्र नियमितपणे दाखल करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

विशेष मोहिमेत प्रलंबित विवरणपत्र दाखल करा: अपर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग छत्रपती संभाजीनगर क्षेत्रातील ज्या GST करदात्यांचे 3B विवरणपत्र दाखल करण्याचे प्रलंबित असतील त्यांनी हे विवरणपत्र मोहीम कालावधीत दाखल करावेत व पुढील कारवाई टाळावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर क्षेत्राचे अपर आयुक्त (राज्य वस्तू व सेवाकर विभाग) अभिजीत राऊत (भा प्र से) यांनी केले आहे.



# जय भवानी विद्या मंदिरात क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**महाराष्ट्र राज्यात खेळाचा प्रचार प्रामुख्याने शहरी भागात दिसतो. ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये क्रीडा संस्कृती पोहचवणे आवश्यक असल्यामुळे शासनाने १२ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत क्रीडा सप्ताह आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.या उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील जय भवानी विद्या मंदिर आणि विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.आज सकाळी १०.०० वाजता डॉ. नामदेवराव गाडेकर, जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष यांच्या शुभहस्ते क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी, खंडू यादवराव, मंडळाचे सचिव श्री. रंगनाथराव जाधव, प्रशालेचे मुख्याध्यापक डॉ. अरुण कांबळे, उपमुख्याध्यापिका सौ. मनीषा रांजणीकर व पर्यवेक्षिका सौ. सुनीता मोरे उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी क्रीडाधिकारी आणि मंडळाचे पदाधिकारी विद्यार्थ्यांना आरोग्य आणि क्रीडा विषयक मार्गदर्शन दिले. क्रीडा सप्ताहाची सुरुवात कबड्डी खेळाने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र देवरे यांनी केले, तर आभार डॉ. अरुण कांबळे यांनी मानले. शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांनी सर्व तालुका शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना क्रीडा सप्ताहात सहभागी होऊन विद्यार्थ्यांना खेळात भाग घेण्याचे आवाहन केले.

# माजी उपमुख्यमंत्री व लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई (प्रतिनिधी)** माजी उपमुख्यमंत्री व लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात शुक्रवारी भावपूर्ण आणि गरिमामय वातावरणात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.पक्षात तसेच राज्यातील जनतेच्या मनात विशेष स्थान असलेल्या या लोकप्रिय नेत्यांच्या जयंतीनिमित्त विविध स्तरांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि चाहत्यांनी उपस्थित राहून त्यांना आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमाची सुरुवात स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या वेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी मुंडे यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीची आणि संघटन बांधणीतील त्यांच्या अद्वितीय योगदानाची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, मुंडे यांनी आयुष्यभर ग्रामीण भागातील सामान्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि राज्यातील राजकारणाला नवी दिशा दिली. प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत यांनीही भाषणात मुंडे यांच्या सामाजिक कार्यातील समर्पणाचा उल्लेख केला. त्यांनी म्हटले की, महाराष्ट्रातील अनेक तरुणांना दिशा देणारे, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करणारे आणि संघटन मजबूत करणारे नेते म्हणजे गोपीनाथ मुंडे.ज्येष्ठ नेते विनोद धोत्रे यांनी मुंडे यांच्या नेतृत्वगुणांची, संघर्षशील प्रवृत्तीची आणि जनतेशी असलेल्या त्यांच्या सखोल नात्याची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, मुंडे यांचे व्यक्तिमत्त्व हे सर्व कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी होते आणि आजही त्यांची विचारधारा मार्गदर्शक ठरते.




कार्यक्रमाला अनेक पदाधिकारी, महिला मोर्चा व युवा मोर्चाचे प्रतिनिधी, तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी मिळून त्यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांच्या स्वप्नातील सक्षम, सुशासनात्मक आणि जनकल्याणकारी महाराष्ट्रासाठी काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.मुंडे साहेबांची जयंती ही केवळ स्मरणपूर्ती नसून, त्यांच्या आदर्श आणि कार्यपद्धतीला पुढे नेण्याचा दिवस म्हणून साजरी करण्यात आली.

# कृष्णा डायग्नोस्टिक लि. केज उत्कृष्ट आरोग्य सेवेबद्दल एन ए बी एच कडून सन्मानित

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** केज येथील उपजिल्हा रुग्णालयात कृष्णा डायग्नोस्टिक लि. सिटीस्कॅन सेवा देणाऱ्या या खाजगी कंपनीस रुग्णांना उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल न्यू दिल्ली एन ए बी एच यांच्याकडून सन्मानपत्र प्राप्त झाले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दत्तात्रेय केंद्रे, स्त्री रोग तज्ञ डॉ इंगोले,डॉ. हनुमंत सौदागर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.मॅनेजर विवेकानंद स्वामी , तंत्रज्ञ अशोक दहिफळे, बाजीराव चाटे,अभिजित थोरात, सिद्धार्थ मुंडे,ज्ञानदेव मुंडे सुषमा सोनवणे यांनी दिलेल्या सेवेबद्दल हे सन्मानपत्र प्राप्त झाले आहे



ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली आरोग्य सेवा दिल्याबद्दल हे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यापुढील कालावधीमध्येही २४ तास सेवा उपलब्ध राहील अशी माहिती कंपनीचे प्रमुख स्वामी विवेकानंद यांनी दिली.

# मीडिया कव्हरेजमध्ये सत्यता, निष्पक्षता आणि जबाबदारीचे महत्त्व - डॉ. जयदेव डोळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** आजच्या डिजिटल युगात माहितीचा प्रसार अभूतपूर्व वेगाने होत आहे. अशा परिस्थितीत माध्यमांनी सत्यता, निष्पक्षता आणि सामाजिक जबाबदारी जपत काम करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पडेगाव येथील सिद्धार्थ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स कॉलेजमध्ये आयोजित जनसंवाद आणि पत्रकारिता या विद्यार्थी संवादात बोलताना डॉ. जयदेव डोळे यांनी केले.डॉ. डोळे म्हणाले की, माध्यम नीतिमत्ता म्हणजे पत्रकार व माध्यम संस्थांनी काम करताना पाळायचे नैतिक, व्यावसायिक नियम. यामध्ये प्रमुख गोष्टींचा समावेश होतो:अचूक व सत्य माहिती देणे - चुकीची, अर्धसत्य किंवा दिशाभूल करणारी माहिती टाळणे आणि बातमी प्रकाशित करण्यापूर्वी तथ्यांची तपासणी करणे.

निष्पक्षता आणि समतोल राखणे - कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक गटाच्या हितसंबंधांपासून दूर राहून सर्व बाजूंना समान संधी देणे.गोपनीयतेचा आदर ठेवणे - व्यक्तींच्या खासगी जीवनाचा भंग होईल अशा बातम्या टाळणे. संवेदनशील वृत्तांकन - दंगली, आपत्ती, आत्महत्या किंवा लैंगिक शोषणावरील बातम्या देताना पीडितांच्या भावना व प्रतिष्ठेचा आदर करणे.उत्तरदायित्व स्वीकारणे - चुकीची बातमी दिल्यास त्वरित दुरुस्त करणे आणि पत्रकार म्हणून आपल्या कृतीची जबाबदारी घेणे.माध्यम नीतिमत्ता पाळणे आवश्यक आहे कारण माध्यम हे लोकशाहीचे चौथे स्तंभ मानले जाते. नीतिमत्तेपासून दूर गेले, तर समाजाच्या विश्वासावर परिणाम होऊन गोंधळ निर्माण होऊ शकतो, असे डॉ. डोळे यांनी सांगितले. यासाठी माध्यम संस्थांनी अंतर्गत धोरणे मजबूत करणे, पत्रकारांसाठी नियमित नीतिमत्तेचे प्रशिक्षण आयोजित करणे आणि संपादकीय स्वातंत्र्य अबाधित राखणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमात प्राचार्य मनोहर वानखेडे यांनी डॉ. डोळे यांचे स्वागत केले. प्रा. पूजा गिरी यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.







# लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांची जयंती; भाजपा जालना महानगरतर्फे अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** लोकनेते माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगरतर्फे स्व. मुंडे चौक व भाजपा कार्यालयात कार्यक्रम आयोजित केला गेला. यावेळी माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, राजेशजी राऊत, अशोक अण्णा पांगारकर, विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगीताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, अमोल धानुरे, वैशाली बनसोडे, देविदास देशमुख, राजेश जोशी, अमोल कारंजेकर, प्रा. कपिल दहेकर, सुभाष सले, अरुणा जाधव, सोमेश काबलीये, अशोक पवार, कल्याण भदणेकर, बाबासाहेब कोलते, रोहित नलावडे, अमन मित्तल, इम्रान सय्यद, शाम उगले, शंकर वायाळ, बद्री जांगडे तसेच अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# उत्पन्न असूनही आयकर रिटर्न दाखल न केल्यामुळे अनेक अपघातग्रस्त व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय कायदेशीर नुकसान भरपाईपासून वंचित

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** उत्पन्न असूनही आयकर रिटर्न दाखल न केल्यामुळे अनेक अपघातग्रस्त व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय कायदेशीर नुकसान भरपाईपासून वंचित राहत आहेत, असे अधोरेखित करत ड. महेश एस. धनावत यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. ते म्हणतात की, जालना जिल्ह्यातील अनेक नागरिक चांगले उत्पन्न मिळवत असले तरी, आयकर रिटर्न दाखल करण्याबाबत उदासीन आहेत. यामुळे अपघात झाल्यास किंवा दुर्दैवी मृत्यू झाल्यास, न्यायालयात उत्पन्नाचा ठोस पुरावा सादर करणे कठीण होते आणि परिणामी पीडितांना मिळणारी नुकसान भरपाई कमी केली जाते किंवा नाकारली जाते. त्यामुळे नागरिकांनी आपले आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यासाठी वेळेवर आयकर रिटर्न दाखल करणे अत्यंत आवश्यक आहे.

धनावत यांनी कलकत्ता उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वाच्या निकालाचा संदर्भ देत या विषयाचे गंभीरपण अधोरेखित केले. या प्रकरणात (संध्या राणी जना विरुद्ध आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लि.) न्यायालयाने स्पष्ट केले की, मोटार अपघात दाव्यांमध्ये पीडित व्यक्तीचे उत्पन्न निश्चित करण्यासाठी दाखल केलेले आयकर रिटर्न हे अधिकृत आणि विश्वसनीय आधार मानले जाईल. न्यायमूर्ती बिस्वरूप चौधरी यांच्या खंडपीठाने म्हटले की, एकदा आयकर विभागाने रिटर्न स्वीकारले की, ते पीडित व्यक्तीच्या उत्पन्नाचा अधिकृत दस्तऐवज बनते आणि त्यावर अविश्वास दाखवण्याचे कारण नसते.उच्च न्यायालयाने आपल्या निकालात सांगितले की, जर व्यक्तीने आयकर रिटर्न दाखल केले नसेल, तर दावेदारांना उत्पन्न सिद्ध करण्यासाठी बँकेचे पासबुक, व्यवसायाची हिशेबपत्रके आणि इतर कागदपत्रे सादर करावी लागतात, जे वेळखाऊ आणि क्लिष्ट असते. मात्र, आयकर रिटर्न दाखल असताना, त्याची पडताळणी आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत होत असल्याने, ते उत्पन्नाचा वैधानिक पुरावा मानला जातो. सदर प्रकरणात मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी तीन वर्षांचे आयकर रिटर्न सादर केले होते, तरी अपघात न्यायाधिकरणाने उत्पन्न कमी गृहीत धरले होते. उच्च न्यायालयाने हे चुकीचे ठरवले आणि स्पष्ट केले की, पीडित व्यक्तीच्या हयातीत आयकर रिटर्न दाखल असताना उत्पन्न कमी दाखवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

धनावत यांनी असेही सांगितले की, पगारदार व्यक्तीचे उत्पन्न त्याच्या सॅलरी स्लिपवरून सिद्ध करता येते, तर स्वयं-रोजगारित व्यक्तीच्या बाबतीत, आयकर विभागासमोर घोषित केलेले उत्पन्न हा अधिकृत पुरावा ठरतो. सर्वोच्च न्यायालयानेही विविध निकालांमध्ये आयकर रिटर्नला उत्पन्नाचा एक महत्त्वाचा वैधानिक दस्तऐवज मान्यता दिली आहे.जालन्यातील परिस्थितीवर बोलताना ड. धनावत यांनी नमूद केले की, शहरातील व्यापारी, व्यावसायिक आणि शेतकरी चांगले उत्पन्न मिळवतात, परंतु कायदेशीर प्रक्रियेची अज्ञानता किंवा निष्काळजीपणामुळे आयकर रिटर्न भरणे टाळतात. अपघात हे अनपेक्षित असते; अशावेळी कुटुंबातील कमावत्या व्यक्तीच्या मृत्यू किंवा अपंगत्वामुळे नुकसान भरपाई हा कुटुंबासाठी आर्थिक आधार ठरतो. केवळ रिटर्न दाखल न केल्यामुळे हा हक्क वंचित राहतो, हे कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निकालाने स्पष्ट केले आहे.

त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, फक्त कर वाचवण्यासाठी किंवा प्रक्रिया टाळण्यासाठी रिटर्न दाखल न करणे चुकीचे ठरेल. कर्ज प्रकरण, व्हिसा प्रक्रिया आणि विशेषतः अपघात नुकसान भरपाईसारख्या महत्त्वाच्या कायदेशीर प्रकरणांमध्ये आयकर रिटर्न एक अनिवार्य दस्तऐवज आहे. त्यामुळे सर्व पात्र नागरिकांनी नियमितपणे आपले आयकर रिटर्न दाखल करून आपले आणि आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करावे.

आणखी महत्त्वाची बाब म्हणजे, आयकर रिटर्न नियमितपणे दाखल केल्यास, न्यायालयीन प्रक्रियेत उत्पन्न सिद्ध करण्याची प्रक्रिया सोपी होते, अपघात किंवा अनपेक्षित घटना घडल्यास नुकसान भरपाईचे हक्क सहज मिळवता येतात, तसेच करदायित्वाचे पालन केलेले असल्यामुळे भविष्यातील कायदेशीर व आर्थिक गुंतागुंत टाळता येते. यामुळे नागरिकांना केवळ करदायित्व पूर्ण करण्याचा लाभ नाही, तर अपघात, मृत्यू किंवा अपंगत्वाच्या परिस्थितीत त्यांच्या कुटुंबीयांचे भविष्य सुरक्षित राहते.

## अज्ञात जंगली प्राण्यांनी-संभाव्य लांडगा किंवा बीबट्या-मेंढ्यांवर हल्ला

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/ प्रतिनिधी/** आपल्या माहितीप्रमाणे, गंगाराम नाना तांबे यांचे नादगांव येथील कपाशीच्या शेतात धनगर बंधूंनी मेंढ्या चारण्यास आणल्या होत्या. परंतु, रात्री अज्ञात जंगली प्राण्यांनी-संभाव्य लांडगा किंवा बीबट्या-मेंढ्यांवर हल्ला करून एक मेंढी मारल्याची घटना घडली आहे. सध्या त्यांना एकूण आठ-दहा मेंढ्या जंगली प्राण्यांनी मारल्याचे आणि खाल्ल्याचे नुकसान झाल्याचे सांगितले गेले आहे. ही घटना आर्थिक दृष्ट्या देखील मोठे नुकसान निर्माण करते, कारण मेंढ्या पाळणे आणि त्यांचे व्यवस्थापन हे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आहे.

गंगाराम नाना तांबे यांनी प्रशासन आणि शासनाकडे विनंती केली आहे की त्यांनी या घटनेची दखल घ्यावी, जंगली प्राण्यांच्या हल्ल्यापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करावे, आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याच्या उपाययोजना कराव्यात. या संदर्भात संबंधित विभागांनी त्वरित स्थलावर जाऊन चौकशी करणे, शक्यतो जंगली प्राण्यांची ओळख करणे, आणि भविष्यात अशा प्रकारच्या हल्ल्यांपासून शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलणे आवश्यक आहे.शेतकऱ्याचे संपर्क तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

अशा घटनांमध्ये प्रशासनाची त्वरीत दखल घेणे आणि नुकसान भरपाईसाठी कार्यवाही करणे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

## मामा चौकातून मोहिमेला प्रारंभ

# जालना मनपाकडून श्रमदान स्वच्छता अभियानाची सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जालना शहर महानगरपालिकेतर्फे शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता मामा चौक येथून श्रमदान स्वच्छता अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी मा. जिल्हाधिकारी तथा जालना महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी हुतात्मा जर्नाधन मामा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर इम्पॅक्ट ॲडव्हर्टायझिंग यांच्या मार्गदर्शक फलकाचे उद्घाटन करून अभियानाचा शुभारंभ झाला.




संपूर्ण प्रभागात स्वच्छतेची मोठी मोहीम

अभियानाअंतर्गत मामा चौक, हॉटेल विजय विलास रोड, महावीर चौक, अलंकार टॉकीज चौक, सिंधी बाजार, खवा मार्केट, सुभाष रोड, मुख्य मार्केट, महेंद्र एजन्सी परिसर अशा संपूर्ण प्रभागातील रस्त्याच्या दोन्ही बाजूंची झाडाझडती, नाल्यांची साफसफाई, कचऱ्याचे ढिगारे हटवणे अशी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता करण्यात आली.

कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई

स्वच्छता मोहिमेदरम्यान गरीबशहा बाजार येथे कचरा जाळणाऱ्यांवर रु. २,०००/- दंड आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून गाडीच्या बाजूला कचरा टाकल्याबद्दल रु. २,०००/- असा एकूण रु. ४,०००/- दंड वसूल करण्यात आला.

**अधिकाऱ्यांची उपस्थिती**

मोहिमेत अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपयुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, स्वच्छता निरीक्षक, सर्व विभागीय अधिकारी-कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शहरातील विविध सामाजिक संस्था देखील मोहिमेत सहभागी झाल्या.

**नागरिकांना आवाहन**

आयुक्त आशिमा मित्तल यांनी नागरिकांना आवाहन केले की-शहरात कुठेही कचरा जाळू नये. कचरा जाळताना कोण आढळल्यास मनपा कारवाई करील. तसेच अशा प्रकारच्या घटना दिसल्यास नागरिकांनी मनपाच्या निदर्शनास आणून द्यावे.

## घुंगर्डे हादगाव येथे ऊसतोड कामगार व बालकांना हिवाळ्यात उबदार मदतीचा हात

**आत्ताच एक्सप्रेस**

**सुखापूरी /प्रतिनिधी/** घुंगर्डे हादगाव येथे ऊसतोड कामगार व त्यांच्या लहान मुलांसाठी हिवाळ्यात उबदार मदत कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला. सध्या कडाक्याची थंडी सुरु असताना, शेतात दिवसभर कष्ट करणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या जीवनात हिवाळा खूप कठीण ठरतो. अनेकदा झोपड्यांमध्ये गरमीचे पुरेसे साधन नसल्यामुळे वृद्ध, महिला, लहान मुले आणि कामगार थंडीत थरथरतात. अशा परिस्थितीत हंस फाउंडेशनने या गरजांना प्रतिसाद देत घुंगर्डे हादगाव येथे उबदार सेवा उपक्रम राबवला.



या मोहिमेअंतर्गत प्रौढ कामगारांना ब्लँकेट्स वाटप करण्यात आले, तर थंडीने त्रस्त होणाऱ्या लहान मुलांसाठी स्वेटर दिले गेले. वितरणाच्या वेळी उपस्थित लोकांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद हा या उपक्रमाचे खरे यश ठरले. महिला, मुले, वृद्ध आणि गरजू कुटुंबीय हे प्रत्येक ब्लँकेट किंवा स्वेटर हातात घेताच त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद व्यक्त होत होता.

हंस फाउंडेशन अनेक वर्षांपासून समाजातील अंध, अपंग, विधवा, निराधार आणि कामगार कुटुंबांसाठी विविध सेवा उपक्रम राबवत आहे. कोणताही जीव थंडीने थरथरू नये या भावनेतून हा उपक्रम पुढे नेण्यात आला. या उपक्रमासाठी दानशूर नागरिकांनी आर्थिक मदत, ब्लँकेट्स, स्वेटर तसेच इतर आवश्यक साहित्य देऊन आपला उदार हात दिला, ज्यामुळे अनेक कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना थंडीत उबदारतेची सोय मिळाली.

कार्यक्रमानंतर गावकऱ्यांनी आणि ऊसतोड कामगारांनी हंस फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमात मान्यवर उपस्थित होते सरपंच कृष्णासिंह पवार, समृद्धी कारखान्याचे कर्मचारी संतोष काकडे, शेतकरी शामराव शेळके, संस्थेचे प्रतिनिधी माऊली दोबोले, महादेव शिंगटे, जालिंदर चोरमले, गोविंद कोळेकर, मा. सरपंच शिवाजी बाम्हणे, योगेश हेंद्रे, लक्ष्मण पवार आदी.

उपक्रमाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना हंस फाउंडेशनच्या प्रतिनिधींचे म्हणणे होते, ऊसतोड कामगार किंवा निराधारांसाठी कडाक्याच्या थंडीपासून बचावाचे साधन नसताना, जेव्हा आपण त्यांच्यापर्यंत उबदार चादर वा स्वेटर घेऊन पोहोचतो, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद कोणत्याही पैशाने मोजता येत नाही. ही सेवा शक्य झाली ती समाजातील दानशूर बांधवांच्या सहकार्यामुळे. त्यांच्या प्रत्येक मदतीबद्दल मनःपूर्वक आभार. हा उपक्रम केवळ गरजूंना उबदार वस्तू पुरवण्यापुरता मर्यादित नाही तर समाजात एकजूट, सहानुभूती आणि सामाजिक बांधिलकीची भावना वाढवण्याचा प्रयत्नही आहे. भविष्यात अशा प्रकारच्या मोहिमांनी आणखी जास्त प्रमाणात गरजूंपर्यंत पोहोचून त्यांच्या जीवनात थोडासा आनंद आणि उबदारपणा निर्माण करणे अपेक्षित आहे.




## महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांचा अभूतपूर्व उत्फूर्त प्रतिसाद - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** भारतीय जनता पार्टी, जालना महानगरतर्फे आगामी जालना महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज विक्री करण्याची प्रक्रिया आज दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा भाजपा जिल्हा कार्यालयात सुरू करण्यात आली. अर्ज वितरणाच्या पहिल्याच दिवशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आज पहिल्याच दिवशी एकूण ३०७ इच्छुक उमेदवारी फॉर्म चे वाटप करण्यात आले. या प्रसंगी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह राजेशजी राऊत, अशोक अण्णा पांगारकर, विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगीताई देशपांडे, अरुणा जाधव इत्यादी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.


या वेळी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, जालना महानगरपालिकेची आगामी निवडणूक असून भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी उत्साहाने सहभागी होत आहे. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि जनतेच्या अपेक्षांना प्राधान्य देणारे सक्षम उमेदवार देण्याचा भाजपा महानगराचा संकल्प आहे. अर्ज वितरणास मिळालेला आजचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता पक्ष संघटनेची भक्कम ताकद आणि जनतेचा भाजपावरील विश्वास अधिक दृढ असल्याचे दिसून येते. जालना शहराचा विकास हा भाजपाचा केंद्रबिंदू मानून शहराच्या पुढील पाच वर्षांच्या विकासाचा अजेंडा तयार करून जालना महानगरपालिकेतील जनतेच्या दैनंदिन समस्या वीज, पाणी, स्वच्छता व सुंदर रस्ते याला प्राधान्य देणारी असेल व हे मुद्दे घेऊन आम्ही जनतेसमोर जाणार असून जनता निश्चितच या मुद्द्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या पाठीसी उभी राहून जालना महानगरपालिकेत भाजपा चे मोठ्या संख्येने उमेदवार निवडून देतील असा मला पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

# होमगार्ड वर्धापन दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना येथील होमगार्ड कार्यालयाकडून ७९ वा होमगार्ड वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा समादेशक तसेच अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. जिल्हा होमगार्ड कार्यालय जालना तर्फे ७९ वा वर्धापन दिनानिमित्त दि.८ डिसेंबर २०२५ पासून वर्धापन सप्ताह सुरू करण्यात आला. या सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात आले, ज्यामध्ये मुख्यतः सामाजिक बांधिलकी, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक सहभाग यांचा समावेश होता. वृक्षारोपण मोहिमेद्वारे परिसरातील हिरवाई वाढविण्यावर भर देण्यात आला तर स्वच्छता अभियानाद्वारे नागरिकांना स्वच्छता राखण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

दि.१२ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा होमगार्ड कार्यालय जालना येथे ध्वजारोहण, पथसंचलन आणि विविध सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी जिल्हा समादेशक होमगार्ड व अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी होते. त्यांनी ध्वजारोहण करीत कार्यक्रमाचा शुभारंभ केला आणि वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमाला प्रोत्साहन दिले.कार्यक्रमात प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड, केंद्र नायक राजेंद्र शेळके, तालुका समादेशक शरद मोरे, पलटन नायक पुंडलिक अंभोरे, पलटन नायक के.एम. शेख, ए. बी. पठाण, श्री. शेजुळ यांच्यासह समस्त होमगार्ड महिला व पुरुष सैनिक उपस्थित होते. त्यांनी उत्साहाने पथसंचलनात सहभाग घेतला आणि होमगार्ड संस्थेच्या गौरवाची झळक अनुभवली.



हा वर्धापन दिन केवळ एक औपचारिक कार्यक्रम नव्हता, तर समाजसेवा, कर्तव्यपरायणता आणि शिस्तीची ओळख देणारा उपक्रम ठरला. विविध उपक्रमांमुळे उपस्थित सर्वांनी होमगार्ड संस्थेच्या कार्याची महत्त्वाची माहिती मिळवली तसेच सामाजिक बांधिलकी आणि नागरिकांबरोबर सहकार्य करण्याचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे आयोजन प्रसिध्दीपत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

## गोपिनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त नाव्होली जि.प.शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/प्रतिनिधी/**एका छोट्याशा गाव खेड्यातुन दिल्लीचे तख्त गाजवणारे स्व. गोपिनाथरावजी मुंडे साहेब यांची आज जयंती असल्याने व त्यांच्या कन्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात सर्वत्र सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे आदेश आल्याने केज तालुक्यातील भाजपाचे सर्वच कार्यकर्ते तालुक्यातील सर्वच शाळेत शालेय साहित्य, रक्तदान शिबीर, गरीब गरजुंना संसार उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,एकेकाळी बिड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नात्रा गावात एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेणारे आणि प्रतिकुल परिस्थितीतून मार्ग काढत शुन्यातून विश्र्व निर्माण करत राजकारणात आपला ठसा उमटवणारे अर्थात जिल्ह्याची मुलुख मैदानी तोफ म्हणुन ओळखले जाणारे स्व.गोपिनाथरावजी मुंडे साहेब यांची आज जयंती असल्याने हा कार्यक्रम सर्वत्र साजरा करण्यात येतो. परंतु स्व.गोपिनाथराव मुंडे यांच्या कन्या पर्यावरण मंत्री मा. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना स्व.गोपिनाथराव मुंडे यांची जयंती सामाजिक उपक्रम घेऊन साजरी करण्याचे आदेश दिल्याने केज तालुका भाजपाच्या वतीने तालुकाध्यक्ष मा.श्री.भगवाराव केदार यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, सदरच्या कडाक्याच्याची पडल्याने गोरगरीब व गरजु कुटुंब जे की,अगदी गावाबाहेर पालाची झोपडी करुन राहतात. त्यांना बँल्केटचे वाटप तसेच शासकीय दवाखान्यात रक्ताचा तुटवडा भासत असल्याने काही ठिकाणी रक्तदान शिबीर असे उपक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून केज तालुक्यातील नाव्होली येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत काल दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वा. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला वही, पेन,बिस्केट मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला असणारे प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य मा. संतोष (दादा) हांगे,पंचायत समितीचे सदस्य तथा भाजपाचे तालुकाध्यक्ष या.श्री.भगवान केदार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813